| शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य | सत्यमेव जयते महाराष्ट्र शासन | Government of Maharashtra DIRECTORATE OF EDUCATION (Secondary & Higher Secondary) Maharashtra State |
|---|---|---|
| मध्यवर्ती इमारत, डॉ.ॲनी बेझंट मार्ग, पुणे-४११००१ | | Central Building, Dr.Annie Besant Road, Pune-1 |

w'site : education.maharashtra.gov.in Phone : (020) 2612 0361 e-mail : doehighersec@gmail.com


परिपत्रक

क्र.विद्या-ए-१/११.प्रवेश/२०२२/1330
दिनांक-१७/०५/२०२२

19 MAY 2022

प्रति,
विभागीय शिक्षण उपसंचालक,
मुंबई, पुणे, नाशिक, अमरावती, नागपूर

**विषय- इ.११वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन.२०२२-२३ कार्यवाही सुरु करणेबाबत.**

**संदर्भ-** १.शासन निर्णय क्र. प्रवेश-२०१८/प्रक्र.३३३/एसडी-२ दि.२३/०६/२०२० .
२.शासन पत्र क्र. प्रवेश-०६२१/प्रक्र.३३३/एसडी-२ दि.२९/०६/२०२१.
३.राज्यस्तर इ.११वी प्रवेश नियंत्रण समिती बैठक दि.१३/०५/२०२२

सन.२०२२-२३ मध्ये राज्यातील मुंबई महानगर क्षेत्र(MMR) तसेच पुणे, पिंपरी-चिंचवड, नाशिक, अमरावती, नागपूर महानगरपालिका क्षेत्रांतील इ.११वी चे प्रवेश केंद्रीय ऑनलाईन पद्धतीने करण्यात येणार आहेत. उर्वरित महाराष्ट्रातील प्रवेश प्रचलित पद्धतीनुसार करण्यात येतील. संचालनालयाचे पत्र जाक्र.२४१८ दि.१३/०४/२०२२ अन्वये प्रवेश प्रक्रियेबाबत आवश्यक पूर्वतयारी करणेबाबत आपणास सूचित करण्यात आलेले आहे. त्यानुसार आवश्यक कार्यवाही आपण केलेली असेल.

**मुंबई महानगर क्षेत्र(MMR), पुणे, पिंपरी-चिंचवड, नाशिक, अमरावती, नागपूर महानगरपालिका** क्षेत्रांतील इ.११वी चे प्रवेश केंद्रीय ऑनलाईन पद्धतीने करण्यात येणार असल्याने या शहरांमध्ये राबविण्यात येणाऱ्या इ.११वी प्रवेश प्रक्रियेची कार्यवाही सोबतच्या वेळापत्रकानुसार सुरु करणेत येत आहे. त्यासाठी https://11thadmission.org.in हे पोर्टल असेल. विद्यार्थ्यांनी सदर संकेतस्थळास भेट देऊन आपणास प्रवेश घ्यावयाच्या क्षेत्राची निवड करावी व प्रवेशासाठी आवश्यक पुढील कार्यवाही करावी.

**ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी कार्यवाहीचे टप्पे खालीलप्रमाणे असतील.**

| क्र | संबंधित घटक | कार्यवाहीचा तपशील |
|---|---|---|
| १ | उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांसाठी | **विद्यालय नोंदणी Jr College Registration**<br>(प्रवेश देण्यासाठी कनिष्ठ महाविद्यालयांनी या संकेतस्थळावर नोंदणी करणे आवश्यक आहे. त्यासाठी लॉगीन आयडी व पासवर्ड सेट करुन विद्यालयाबाबतची माहिती ऑनलाईन भरुन भरलेली माहिती शिक्षण उपसंचालक यांचेकडून प्रमाणित करुन घेणे.) |
| २ | विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन अर्ज भरण्याचे टप्पे | **१)विद्यार्थी नोंदणी Student Registration.**<br>(विद्यार्थ्यांनी ऑनलाईन नोंदणी करुन लॉगीन आयडी व पासवर्ड सेट करणे)<br>**२)प्रवेश अर्ज भाग-१ भरणे**<br>(भरलेला अर्ज आपली माध्यमिक शाळा किंवा मार्गदर्शन केंद्र यांचेकडून प्रमाणित करुन घेणे.)<br>**३)पसंतीक्रम देणे, भाग-२ (Option Form) भरणे**<br>(प्रवेश फेरीपूर्वी प्रवेशासाठी पसंतीची कनिष्ठ महाविद्यालये ऑनलाईन निवडणे) |
| ३ | प्रवेश प्रक्रियेची कार्यपद्धती | • विद्यार्थ्यांना कनिष्ठ महाविद्यालयामध्ये प्रवेश दोन प्रकारे घेता येतील.<br>**१.केंद्रीय प्रवेश फेऱ्यांद्वारे Allotment मिळवून. (CAP Seats) किंवा**<br>**२.कोटांतर्गत राखीव जागांवर संबंधित विद्यालयास संपर्क साधून.**<br>• प्रवेश मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भाग-१ भरुन प्रमाणित करुन घेणे आवश्यक आहे. त्यानंतर (CAP Seats) करीता आयोजित करण्यात येणाऱ्या प्रत्येक फेरीपूर्वी विद्यार्थ्यास अर्जाचा भाग-२-पसंतीक्रम भरुन विद्यालये निवडता येतील. (किमान-१ व कमाल-१०)<br>• विद्यार्थ्यांनी दिलेल्या पसंतीक्रमानुसार प्रवेश फेरीमध्ये Allotment देण्यात येईल व त्यानुसार विद्यार्थ्यांनी संबंधित मिळालेल्या विद्यालयास संपर्क साधून आपला प्रवेश दिलेल्या वेळेत निश्चित करावयाचा आहे. |

**कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये प्रवेशासाठी उपलब्ध जागांची विभागणी पुढीलप्रमाणे असेल.**

| | | बिगर अल्पसंख्याक | अल्पसंख्याक विद्यालये |
|---|---|---|---|
| १ | **केंद्रीय प्रवेश फेरीद्वारे प्रवेश (CAP Seats)** | ८५% | ३५% |
| २ | संस्थांतर्गत कोटा (InHouse Quota) | १०% | १०% |
| ३ | व्यवस्थापन कोटा (Management Quota) | ५% | ५% |
| ४ | अल्पसंख्याक कोटा (Minority Quota) | लागू नाही | ५०% |

**अल्पसंख्याक कोटा** फक्त अल्पसंख्याक कनिष्ठ महाविद्यालयात उपलब्ध असेल आणि या जागांवर अल्पसंख्याक प्रवर्गातील विद्यार्थ्यांना प्रवेश देता येईल. **इनहाऊस कोटा** हा त्यांच संस्थेची माध्यमिक शाळा संबंधित विभागात असेल तर अशा माध्यमिक शाळांमधील इ.१०वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी लागू असेल. **व्यवस्थापन कोटा** सर्व विद्यालयांना ऐच्छिक स्वरूपात लागू असेल.

कोणत्याही कोटांतर्गत राखीव जागा दिलेल्या वेळेत संबंधित विद्यालयांना केंद्रीय/ CAP प्रवेशासाठी प्रत्यार्पित / Surrender करता येतील. कोटांतर्गत प्रवेश संबंधित कनिष्ठ महाविद्यालय स्तरावरुन गुणवत्तेनुसार देण्यात येतील. त्यासाठी कोटांतर्गत प्रवेशासाठी पसंती दर्शविलेल्या विद्यार्थ्यांची यादी विद्यालयास दर्शविण्यात येईल. विद्यालयामध्ये झालेले सर्व प्रवेश त्या-त्या वेळी संकेतस्थळावर नोंदविले जातील. प्रवेश फेऱ्या व प्रत्यक्ष प्रवेशाचे कार्यवाहीबाबत सविस्तर सूचना यथावकाश देण्यात येतील.

अर्ज भरतांना, केवळ ज्या विद्यार्थ्यांना **मुंबई महानगर क्षेत्र(MMR), पुणे, पिंपरी-चिचवड, नाशिक, अमरावती, नागपूर महानगरपालिका** या शहारांमधील राज्यमंडळ संलग्न कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घ्यावयाचा असेल अशाच विद्यार्थ्यांनी या प्रणालीच्या मध्यमातून अर्ज करावा. राज्यातील उर्वरित ठिकाणच्या प्रवेशासाठी संबंधित कनिष्ठ महाविद्यालयांशी संपर्क साधावा. अशा सूचना विद्यार्थी व पालकांना द्याव्यात.

यासोबत सन.२०२२-२३ मध्ये **मुंबई महानगर क्षेत्र(MMR), पुणे, पिंपरी-चिचवड, नाशिक, अमरावती, नागपूर महानगरपालिका** क्षेत्रांतील इ.११वी चे प्रवेश केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रकियेच्या सुरुवातीच्या टप्प्याचे वेळापत्रक सोबत संलग्न आहे. त्यानुसार प्रसिद्धी देऊन आावश्यक कार्यवाही आपलेस्तरावरुन सुरु करणेत यावी.

मार्गदर्शन केंद्र व माध्यमिक शाळांना विद्यार्थ्यांचे अर्ज प्रमाणित करणेबाबत आवश्यक सूचना देण्यात याव्यात. सर्व संबंधित घटकांसाठी आवश्यकतेनुसार उद्बोधन वर्ग / प्रशिक्षणाचे आयोजन करावे.

**पुणे,**
**दिनांक-१७/०५/२०२२**

**(महेश पालकर)**
**शिक्षण संचालक**
**(माध्यमिक व उच्च माध्यमिक)**

**<u>विद्यार्थ्यांकरीता अर्ज भरण्याच्या सरावासाठी विशेष सुविधा-</u>**

विद्यार्थ्यांना अर्ज भरण्याचा सराव करता यावा प्रत्यक्ष अर्ज भरणे सुलभ व्हावे यासाठी **दिनांक.२३ मे ते २७ मे, २०२२** या कालावधीत, पोर्टलवर **Demo Login** सुविधा देण्यात येत आहे. यामध्ये विद्यार्थ्यांनी अर्ज भरण्याचा सराव करावा.

प्रत्यक्षात अर्ज भरण्याची कार्यवाही **दि.३० मे, २०२२ पासून** सुरु होईल त्यापुर्वी **Demo Login** मध्ये भरलेली माहिती नष्ट करण्यात येईल. प्रत्यक्ष अर्ज भरण्याची कार्यवाही सुरु झालेनंतर विद्यार्थ्यांनी पुन्हा नव्याने नोंदणी करुन लॉगीन आयडी व पासवर्ड जपून ठेवावयाचा आये याबाबत पुरेशी जागरुकता करण्यात यावी.

**<u>विद्यालयांची ऑनलाईन नोंदणी करण्याची कार्यपद्धती-</u>**

परवानगी मिळालेल्या कनिष्ठ महाविद्यालयांची नोंदणी पोर्टलवर करतांना शासन मान्यता पत्र, संलग्न स्तर, उपलब्ध वर्गखोल्या यांची तपासणी करुन माध्यमनिहाय प्रवेश क्षमता निश्चित करावी तसेच, यापूर्वी नोंदणी झालेल्या विद्यालयांची माहिती वरीलप्रमाणे पुनश्च तपासून ती सुधारित / अंतिम करावी. सदर विद्यालयांची माहिती EDIT करण्याची सुविधा पोर्टलवर देण्यात येईल. शासन नियमानुसार तुकडीनिहाय विहित अधिकतम प्रवेश क्षमता पोर्टल आपोआप दर्शवेल. ती प्रवेश क्षमता भौतिक सुविधांचे उपलब्धतेनुसार कमी नोंदविता येईल.

ज्या विद्यालयांनी UDISE नंबर घेतलेले नाहीत त्यांना तात्पुरता लॉगीन आयडी देण्यात येईल तथापि त्यांनी UDISE No. त्वरीत मिळविणे आवश्यक राहील.

अनुदानित वर्गांसाठी लागू शासन विहित शुल्क दर आपोआप दर्शविण्यात येतील. उर्वरित विना अनुदानित, स्वयंअर्थसहायित वर्गांसाठी शुल्क दर विहित पद्धतीने निश्चित केले आहेत याची तपासणी करुन ते पोर्टलवर अंतिम करावेत.

**पुणे,**
**दिनांक-१७/०५/२०२२**

**(महेश पालकर)**
**शिक्षण संचालक**
**(माध्यमिक व उच्च माध्यमिक)**

शिक्षण संचालनालय (मायमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे-१

# इ.११वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०२२-२३

## प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक

**(मुंबई महानगर क्षेत्र तसेच पुणे, पिंपरी-चिचवड, नाशिक, अमरावती, नागपूर महानगरपालिका क्षेत्र)**

**https://11thadmission.org.in**

| क्र | कार्यवाहीचे टप्पे | कालावधी | कार्यवाही |
|---|---|---|---|
| | **विद्यार्थ्यांसाठी नोंदणी व अर्ज भरण्याचा सराव** | **(सरावासाठी सुविधा)** | |
| ० | विद्यार्थ्यांसाठी संकेतस्थळावर नोंदणी व अर्जाचा भाग-१ भरणेसाठी विद्यार्थ्यांना सराव<br>**Mock Demo Registration** | **दि.२३ मे, २०२२ पासून**<br>**दि.२७ मे, २०२२ पर्यंत** | विद्यार्थी स्वत: |
| टीप | **विद्यार्थ्यांना अर्ज भरण्याचा सराव करण्याची सुविधा संकेतस्थळावर देण्यात येत आहे,**<br>**Mock Demo** मध्ये भरलेली माहिती **दिनांक.२८ मे, २०२२ रोजी** नष्ट करण्यात येईल. यानंतर **दिनांक.३० मे,२०२२** पासून प्रत्यक्ष अर्ज भरण्यासाठी नव्याने विद्यार्थी नोंदणी व लॉगीन करुन अर्ज भरावयाचा आहे. | | |
| | **विद्यार्थ्यांसाठी नोंदणी व अर्ज भाग-१ भरणे** | **(प्रत्यक्ष कार्यवाही)** | |
| १ | **ऑनलाईन विद्यार्थी नोंदणी व प्रवेश अर्ज भाग-१ भरणे, अर्ज प्रमाणित करुन घेणे. (प्रत्यक्ष कार्यवाही सुरु)**<br>१) प्रवेश प्रक्रियेच्या संकेतस्थळावर जाऊन विद्यार्थ्यांनी ऑनलाईन नोंदणी करणे. **(लॉगीन आयडी व पासवर्ड मिळविणे)**<br>२)मिळालेल्या लॉगीन आयडी व पासवर्ड वापरुन लॉगीन करणे व इ.११वी प्रवेशासाठी अर्ज (भाग-१) भरणे, ऑनलाईन शुल्क भरुन फॉर्म लॉक करणे. अर्ज प्रमाणित करणेसाठी मार्गदर्शन केंद निवडणे | **दिनांक.३० मे, २०२२ पासून** | विद्यार्थी स्वत: पालकांच्या मदतीने.<br>**(शाळा/ मार्गदर्शन केंद्र यांची मदत घेता येईल)** |
| २ | **विद्यार्थ्यांनी भरलेल्या प्रवेश अर्ज भाग-१ मधील माहिती तपासून प्रमाणित करणे.**<br>विद्यार्थ्याने प्रवेश आर्जात भरलेली माहिती व सादर केलेली कागदपत्रे तपासून मार्गदर्शन केंद्र / माध्यमिक शाळा अर्ज प्रमाणित करतील.<br>** खुल्या प्रवर्गातील राज्यमंडळाच्या विद्यार्थ्यांचे अर्ज आपोआप प्रमाणित होतील. | | माध्यमिक शाळा / मार्गदर्शन केंद्र<br>## |
| | **विद्यालयांसाठी नोंदणी व माहितीमध्ये दुरुस्ती** | | |
| ३ | **उच्च माध्यमिक शाळा नोंदणी / दुरुस्ती.**<br>उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांनी आपली माहिती तपासून अंतिम करणे/ दुरुस्ती करणे. | **दिनांक.३० मे, २०२२ पासून राज्यमंडळ इ.१०वी निकालापर्यंत.** | **कनिष्ठ महाविद्यालये.** |
| ४ | **शिउसं यांनी उच्च माध्यमिक शाळा माहिती प्रमाणित करणे**<br>उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांनी भरलेली माहिती तपासून शिउसं यांनी ऑनलाईन प्रमाणित/व्हेरिफाय करणे. | | **विभागीय शिक्षण उपसंचालक** |
| | **विद्यार्थ्यांसाठी अर्ज भाग-२ भरणे** | **(पसंतीक्रम)** | |
| ५ | **विद्यार्थ्यांनी अर्जाचा भाग-२ मध्ये प्रवेशासाठी आपल्या पसंतीची कनिष्ठ महाविद्यालये निवडून पसंतीक्रम नोंदविणे.**<br>**(नियमित फेरी-१ साठी पसंतीक्रम देणे.)**<br>तसेच<br>**कोटांतर्गत राखीव जागांवरील प्रवेशासाठी पसंतीची कनिष्ठ महाविद्यालये निवडणे तसे ऑनलाईन नमूद करणे.**<br>(अल्पसंख्याक कोटा, इनहाऊस कोटा, व्यवस्थापन कोटा) | **राज्यमंडळ इ.१०वी निकालानंतर सुरु होईल.**<br>(याबाबत तारखा त्यावेळी जाहीर करण्यात येतील) | विद्यार्थी स्वत: पालकांच्या मदतीने |

पुढील प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक नंतर जाहीर करण्यात येईल.

**पुणे, दिनांक-१७/०५/२०२२**

19 MAY 2022

MPalkar

(महेश पालकर)
शिक्षण संचालक
(माध्यमिक व उच्च माध्यमिक)

Directorate of Education (Secondary and Higher Secondary) MS, Pune-1

## Std.11th Centralised Online Admission Process 2022-23

# ADMISSION PROCESS SCHEDULE

**(Mumbai MMR, Pune & Pimpri Chinchwad, Nashik, Amravati, Nagpur, Municipal Corporations)**
**https://11thadmission.org.in**

| Sr | Stages of Process | Duration | Responsibility |
|---|---|---|---|
| | **Demo registration and application for students** | **(Demo Practice only)** | |
| 0 | Practice for students to register on the website and fill up Part-1 of the application<br>**Mock Demo Registration** | **From- May 23, 2022**<br>**To- May 27, 2022** | Student himself |
| Tip | **Students will be facilitated to practice filling up the application form on the portal,**<br>Information filled in the **Mock Demo** will be deleted **on May 28**, After this, from **30th May, 2022**, students have to register freshly and login to fill the application form. | | |
| | **Registration and application for students (Part-1)** | **(Actual action)** | |
| 1 | **Online Student Registration and Admission Form Part-1 Filling, Verofication of Application.**<br>**(Actual process begins)**<br>1) Students can register online by visiting the admission process portal. **(Get login ID and password)**<br>2) Login using the login ID and password received and fill the application form (Part-1) for 11th admission, lock the form by paying the online fee. Selecting a guidance center for form verificationn | **From- May 30, 2022** | Students themmselves, with the help of Guardians.<br>**School/Guidance Centre help can be availed.)** |
| 2 | **To verify the information in the admission form Part-1 filled by the students.**<br>The guidance center / secondary school will verify the application form after checking the information filled by the student in the form and the documents submitted.<br>** Applications of open category State Board students will be autoverified. | | Secondary School / Guidance Centre.<br>## |
| | **Registration and info. correction for Jr. Colleges** | | |
| 3 | **Jr. College registration & info Correction.**<br>Higher Secondary Schools, Junior Colleges will check and finalize / correct their profile information. | **From- May 30, 2022**<br>**Till**<br>**State Board's 10th result.** | **Junior colleges.** |
| 4 | **Verification of Jr. College information by DyDE.**<br>Online verification by DyDE after checking the information filled by higher secondary schools, junior colleges. | | **Divisional Deputy Director of Education** |
| | **Filling of Option form for students (part-2)** | **(Order of preference)** | |
| 5 | **Students to select Jr. colleges of their choice for admission in Part-2 of the application & set the order of preference.**<br>**(Giving preference for regular round-1.)**<br>As well as<br>**To select the preferred junior colleges for admission under the quota seats and also to mention them online.**<br>(Minority quota, in-house quota, management quota) | **Will Start after 10th result of State Board**<br><br>**(Dates will be announced then)** | **Students themmselves, with the help of Guardians.** |

Timetable for the further admission process will be declared thereafter.

**Pune,**
**Dt.17/05/2022**

MPalkar

19 MAY 2022

**(Mahesh Palkar)**
Director of Education
(Secondary & Higher Secondary)